



Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे | अंक : ७३१ . वा | रविवार दि. ०७ एप्रिल २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# छत्रपती संभाजीनगरमधून महायुतीचा उमेदवार कोण? गुढीपाडव्यानंतरच घोषणा होण्याची शक्यता...

**वृत्तसंस्था/छत्रपती संभाजीनगर**

छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचा उमेदवार कोण, याबद्दल संभ्रम कायम आहे. हा मतदारसंघ सोडवून घेण्यासाठी शिवसेनेचे आमदार, मंत्री आग्रही आहेत; तर भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनीही अजून आशा सोडलेली नाही. असे असले तरी उमेदवारीसाठी पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे नाव आघाडीवर आहे. उमेदवाराच्या नावाची घोषणा गुढीपाडव्याच्या दरम्यान होऊ शकेल, अशी माहिती मिळाली आहे.छत्रपती संभाजीनगर हा मतदारसंघ मिळवण्यासाठी शिवसेनेने प्रतिष्ठा पणाला लावली आहे. हा मतदारसंघ परंपरेने शिवसेनेकडेच आहे, पण या पक्षाचे विभाजन झाल्यावर राजकीय गणिते बदलतील आणि भाजपला या मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची संधी मिळेल, असे गृहीत धरून भाजपनेही या मतदारसंघात दीड-दोन वर्षांपासून काम सुरू केले. हा मतदारसंघ सोडायचाच नाही असे शिवसेनेने ठरवल्यामुळे भाजप-ला दोन पावले मागे यावे लागेल, अशी स्थिती सध्यातरी निर्माण झाली आहे.शिवसेनेच्या उमेदवाराबद्दल संभ्रम कायम असल्यामुळे प्रचार कार्यालय, प्रचाराची रणनिती, जाहिर सभांचे नियोजन याचे होमवर्क अद्याप प्रलंबित आहे. निवडणूक लढवण्याच्या अनुषंगाने शुक्रवारी (पाच मार्च) महायुतीच्या नेत्यांची पहिली औपचारिक बैठक भुमरे यांच्या कार्यालयात झाली. या बैठकीनंतरही दोन्हीही पक्षाच्या नेत्यांना आपापल्या पक्षालाच उमेदवारी मिळेल असे अजूनही वाटत असल्याची माहिती सूत्रांनी दिली.



दरम्यान, उमेदवार मुंबईतच ठरणार असून त्याची घोषणा गुढीपाडव्याच्या सुमारास होऊ शकेल, असे बोलले जात आहे. उमेदवाराची घोषणा झाल्यावर या लोकसभा मतदारसंघातील लढतीचे चित्र स्पष्ट होईल.

# ट्रॅक्टर-दुचाकीची भिषण अपघातात हिरडव येथील दाम्पत्य गंभीर जखमी...

## दुसरबीडनजीकची घटना ट्रॅक्टर चालक पोलिसांच्या ताब्यात

**जनसंचलन/दुसरबीड**

दुसरबीडपासून एक किमी अंतरावर असलेल्या गतिरोधकाजवळ ट्रॅक्टर व दुचाकीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातामध्ये दुचाकीवरील पती-पत्नी गंभीर जखमी झाल्याची घटना दि. ५ एप्रिल रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडला. लोणार तालुक्यातील हिरडव येथील हॉटेल व्यावसायिक पार्श्वनाथ जैन हे पत्नीसह दुचाकीवर (एमएच २८ एडब्ल्यू २९५३) सावखेड तेजन येथे जात होते. दुसरबीडनजीकच्या नगरमाळ परिसरातून पुढे मेहकर ते सिंदखेडराजा मार्गावर दुसरबीडनजीक एका गतिरोधकाजवळ ते आले असता समोरून येणाऱ्या (एमएच २८ डी ९९८८) क्रमांकाच्या ट्रॅक्टरने त्यांच्या दुचाकीस चुकीच्या बाजूने येत धडक दिली. यामध्ये दुचाकीवरील पार्श्वनाथ जैन व त्यांच्या पत्नीला गंभीर दुखा-



पत झाली. यावेळी परिसरातील नागरिकांनी या दाम्पत्यास दुसरबीड येथील एका खासगी रुग्णालयात हलविले. तेथे प्रथमोपचार करून त्यांना जालना येथे हलविण्यात आले आहे.अपघातामधील दोघांची प्रकृती धोक्याबाहेर आहे.अपघातग्रस्त ट्रॅक्टर हे मलकापूर पांग्रा येथील असून, चालक गजानन भुजंगराव उगले (४१) हा इंधन भरण्यासाठी नगरमाळावरील पेट्रोलपंपावर जात होता. या दरम्यान हा अपघात झाला. याप्रकरणी अपघात झालेली दोन्ही वाहने आणि ट्रॅक्टरचालक गजानन भुजंगराव उगले यास किनगाव राजा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या अपघातामधील दोन्ही जखमींवर रुग्णालयात उपचार करण्यात येत असून त्यांच्या तर्फे अद्याप कोणीही किनगाव राजा पोलिसात तक्रार दिलेली नाही.

# अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर पोलिस स्टेशनमध्ये जप्त...



**जनसंचलन/ देऊळगावराजा**

महसूलची धडाकेबाज कारवाई सुरूच असल्याने रेती माफियांचे धाबे दणाणले आहे. गुरूवारी रात्री अवैधरित्या विनापरवाना रेतीचे चार ब्रॉस वाहतूक करणारे टिप्पर पकडून कारवाईसाठी पोलीस स्टेशनला जमा करण्यात आले आहे. सदर कारवाई उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली देऊळगाव राजाचे तहसीलदार वैशाली डोंगरजाळ ना. तहसीलदार डॉ. आस्मा मुजावर यांनी केली आहे. याबाबत माहिती अशी की अवैध रेतीची चोरीछुपे वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती मिळतात तहसीलदार वैशाली डोंगरजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ना. तहसीलदार डॉ. आस्मा मुजावर यांनी सापळा रचून एमएच ४२ टी १५ ७८ या क्रमांकाचे टिप्पर अवैध रित्या रेती वाहतूक करताना बोराखेडी जवळ रंगेहात पकडले. या टिप्परचा मालक देऊळगावराजा येथील दीपक परमेश्वर जाधव असल्याचे चालक लक्ष्मण गायकवाड यांनी सांगितले. सदर टिप्पर पकडून दंडात्मक कारवाईसाठी देऊळगाव राजा पोलीस स्टेशन ला जमा करण्यात आले आहे. सदर कारवाईच्यावेळी चालक चव्हाण शेरे आदी महसूलचे कर्मचारी सहभागी होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# जिल्हाभरातून संदीप शेळकेंना ७० हजार पत्रे!

## जिल्ह्याच्या विकासाच्या सांगितल्या संकल्पना...

जनसंचलन/बुलढाणा

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेऊन वन बुलढाणा मिशनचे संकल्पक संदीप शेळके यांनी लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी दाखल केली आहे. जनतेचा जाहीरनामा कार्यक्रमातून त्यांनी जिल्हावासियांना विकासाच्या संकल्पना मांडण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर गेल्या ६ महिन्यांत जिल्ह्यातील तब्बल ७० हजार ७३३ जणांनी संदीप शेळके यांना पत्र लिहून विकासाच्या संकल्पना सांगितल्या. तसेच लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा आग्रह केला. गेल्या वर्षभरापासून संदीप शेळके यांनी वन बुलडाणा मिशन ही राजकीय लोकचळवळ सुरू केली. जिल्ह्याच्या शाश्वत व सर्वांगीण विकासासाठी संदिप शेळके कटिबद्ध आहेत. त्यासाठी त्यांनी लोकसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. संदिप शेळके यांनी लोकसभेसाठी अर्ज भरावा ही जिल्ह्यातील जनमानसाची भावना होती. तशी भावना हजारो नागरिकांनी पत्राद्वारे व्यक्त केली आहे. आपले सामाजिक काम मोठे आहे. जिल्ह्यातील हजारो तरुणांना आपण रोजगार उपलब्ध करून दिला आहे. जिल्ह्याच्या विकासाचे व्हिजन आपल्याकडे आहे. तुमच्यासारखा माणूस संसदेत पोहचला तर जिल्ह्याचा कायापालट होईल. त्यामुळे तुम्ही लोकसभा निवडणुकीत उभे रहावे, आमचे तुम्हाला पूर्ण सहकार्य राहील, असाच बहुतांश पत्रांचा आशय आहे.



# मित्रावरच एका वर्षापासून अनैसर्गिक अत्याचार

## पीडितने केला आत्महत्येचा प्रयत्न; गुन्हा दाखल

जनसंचलन/जळगाव जामोद

आपण म्हणतो मित्र हा मित्राच्या सुखदुःखात नेहमी साथ देतो. तसेच मित्र म्हटले की, आपणास आठवते ती म्हणजे भगवान श्रीकृष्ण व सुदामा यांची मित्रता तसेच एका कवीने आपल्या कवितेत मित्रत्वाच्या नात्याचे अप्रतिम असे वर्णन केले आहे.. दुःख अडवायला उंबरठ्यासारखा मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा परंतु जळगाव जामोद पोलीस स्टेशन हद्दीत येत असलेल्या भेंडवड येथील २३ वर्षीय तरुणावर २७ वर्षीय तरुणाने तब्बल एका वर्षापासून अनैसर्गिक अत्याचार करीत जबरी संभोग केल्याची धक्कादायक घटना २ एप्रिल रोजी समोर आली आहे. सदर या घटनेने जळगाव जामोद तालुकासह जिल्हा हादरून गेला असून पिडीत २३ वर्षीय तरुणाने या त्रासाला कंटाळून विष प्राशन करीत आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याच्यावर अकोला येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दोघेही तरुण एकमेकांचे मित्र आहेत. परंतु गेल्या एक वर्षापासून आरोपी भगवान वाघ यांने पीडित तरुणासोबत शारिरीक संबंध ठेवले. यामुळे आरोपी भगवान वाघ याची वासनेची भुक वाढत गेल्याने तो पीडित तरुणांसोबत नेहमी नेहमी शारीरिक संबंध ठेवत होता. मात्र पिडीत तरुण आरोपीस शारीरिक संबंध ठेवण्यास नकार देत होता. त्यामुळे आरोपी भगवान प्रमोद वाघ याने पीडित युवकासोबत जोर जबरदस्ती करून तो आपल्या शरीराची वासनेची भूक भागवत होता. पीडित तरुण या सर्व प्रकाराला कंटाळला होता. त्यामुळे त्याने उंदिर मारण्याचे विषारी औषध प्राशन करून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. पीडित तरुणाने दिलेल्या जबाबात संपूर्ण घटनाक्रम सांगितल्याने पीडित तरुणाच्या जबाबावरून जळगाव जामोद पोलिसांनी आरोपी भगवान प्रमोद वाघ रा. भेंडवळ २७ वर्षे याच्या विरोधात अप नं २०४/२०२४ कलम ३७७ भादवी, सहकलम अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९ चे कलम ३(२), ३ (२) (व्ही) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी भगवान प्रमोद वाघ हा सध्या फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. सदर गुन्ह्याचा प्राथमिक तपास युद्धपातळीवर जळगाव जामोद येथील ठाणेदार आनंद महाजन करीत असून पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी देवराम गवळी करीत आहेत.

# विषारी औषध प्राशन करून इसमाची आत्महत्या...

जनसंचलन/ खामगाव

विषारी औषध प्राशन करून इसमाने आत्महत्या केल्याची घटना शनिवारी उघडकीस आली आहे. स्थानिक शेगाव रोडवरील एसएसडीव्ही शाळेच्या मागील बाजूस सदर इसमाचा मृतदेह मिळून आला आहे. दुपार दरम्यान शेगाव रोडवर शाळेच्या पाठीमागील भागात काही नागरिकांना एक इसम पडलेला असल्याचे दिसून आले. याबाबत नागरिकांनी खामगाव शहर पोलीस स्टेशनला माहिती दिली. त्यावरून पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी पोलिसांनी सदर इसमाच्या नातेवाईकांना बोलावून घेवून ओळख पटवली असता विनोदसिंग शरदसिंग गौर (४२) असे सदर इसमाचे नाव असल्याचे निष्पन्न झाले. यावेळी यावेळी डॉक्टरांनी तपासणी करून विनोदसिंग शरदसिंग गौर यांना मृत घोषित केले. घटनास्थळी पोलिसांना विषाची बाटली मिळाली असून विनोदसिंग शरदसिंग गौर यांनी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याचे प्रथम दर्शनी दिसन येत आहे.

# मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देणाऱ्या दोघांविरूध्द गुन्हा दाखल

जनसंचलन/ शेगाव

येथील इंदिरा नगरातील दोघांनी एकास मारहाण केल्याची घटना ५ एप्रिल रोजी रात्री ७ वा. च्या सुमारास घडली. याबाबत लक्ष्मी सचिन घाटोळ (३५) रा. इंदिरा नगर यांनी शहर पोस्टेला फिर्याद दिली. त्यामध्ये अशा आशयाचे नमुद करण्यात आले आहे की, नेहा जनार्धन इंगळे व विक्रम जनार्धन इंगळे दोघे रा. इंदीरा नगर यांनी फिर्यादीच्या पतीस लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी फिर्यादी व त्यांचा मुलगा आरोपीच्या तावडीतुन सोडविण्यास गेले असता त्यांना सुद्धा चापटा बुक्क्यांनी मारहाण करून जिवाने मारून टाकण्याची धमकी दिली यात्रकरणी झालेल्या फिर्यादीवरून व मेडीकल सर्टिफिकेट वरून उपरोक्त दोघांविरुध्द भादंवि कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६, ५५०, ३४ अन्वये गुन्हा दाखल केला असुन पुढील पोहेकों विनायक सरोदे करीत आहेत.

# बोलेरो पिकअप व कार अपघातात १ ठार

जनसंचलन/चिखली




बोलेरो पिकअप व कार चा अपघात झाल्याने कार चालक जागीच ठार झाला. सदर घटना ६ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारास उदयनगर ते खामगाव मार्गावरील मोहाडी घाटात घडली. याबाबत हकीकत अशी की उदयनगर कडून पांढऱ्या रंगाचे कंपनीचे नवीन बोलेरो पिक अप खामगावकडे जात असतांना खामगाव वरून उदयनगरकडे येणाऱ्या कार क्रमांक एम. एच. १५ एफ. एन २८३३ ला बोलेरो पिकअप ने जोरदार धडक देऊन कार मार्गाच्या बाजूला जाऊन कोसळली या कार मधील चालक शेख वसीम शेख अ. रसुल वय ३५ वर्ष रा. मंगरूळ नवघरे हा जागीच ठार झाला. वैरागडचे पोलीस पाटील चंदनपाठ, अंनता आढाव, गजानन कोंडेकर सह आदींनी घटनास्थळ गाठून चालकाला कारमधून बाहेर काढत असतानांच घटनास्थळा वरून ते नवीन पांढऱ्या रंगाचे पिकअप फरार झाल्याचे प्रत्यक्ष दर्शींनी सांगितले माहिती मिळताच अमडापूर पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. फरार झालेली पिकअप हरणी मार्गे माटरगाव कडे गेल्याची माहिती घटनास्थळी मिळताच वैरागडचे पोलीस पाटील चंदनपाट यांनी सदर माहिती हरणी माटरगाव कडे संपर्क करून त्या वाहनाचा शोध घेवून पोलिसांनी त्या पिकअप चालकाला पिकअप सह ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी पुढील कार्यवाही अमडापुर पोलीस करीत आहेत

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# लोकसभा निवडणुकीसाठी नियंत्रण कक्ष स्थापन

**जनसंचलन/बुलडाणा**

भारत निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. १९५० या हेल्पलाईनसह नियंत्रण कक्षात दूरध्वनी क्रमांक ०७२६२ २९५००२ आणि टोल फ्री क्रमांक १८०० २३३ ०५८६ कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर निवडणुकीच्या अनुषंगाने नागरिकांच्या तक्रारीवर कार्यवाही करण्यासाठी जिल्हास्तरावर २४७ कंट्रोल रुम स्थापन करण्यात आला आहे. कंट्रोल रुमसाठी पुरेसे मनुष्यबळ नियुक्त करण्यात आले आहे. तसेच आवश्यक यंत्रणा उपलब्ध करण्यात आली आहे. नागरिकांनी केलेल्या प्रत्येक तक्रारीची नोंद वेळेसह तक्रार नोंदवहीमध्ये करण्यात येते. निवडणूक खर्चाच्या संदर्भातील तक्रारी तात्काळ खर्च निरीक्षकास सूचना देऊन भरारी पथकाकडे पाठविण्यात येतात. आदर्श आचार संहितेशी संबंधित तक्रारी निवडणूक निरीक्षक यांना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच तक्रारीवर कार्यवाही करण्यात येत आहे. आवश्यकता भासल्यास भरारी पथकांकडून कार्यवाही करण्यात येणार आहे. सदर नियंत्रण कक्ष सुरळीत सुरु ठेवण्यात येणार आहे.

# प्रताप पंढरीनाथ पाटील यांच्या उमेदवारी अर्जाबाबत स्पष्टीकरण

**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रताप पंढरीनाथ पाटील यांनी बहुजन मुक्ती पार्टीतर्फे उमेदवारी अर्ज दाखल केला. मात्र केंद्रीय निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक ५६/२०२४/ पीपीएस-आयआयआय, दि. २७ मार्च २०२४ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार बहुजन मुक्ती पार्टी पुरस्कृत उमेदवाराकडून पक्षाचा ए व बी फॉर्म स्वीकारण्यात येऊ नये असे कळविण्यात आले आहे. त्यामुळे ए व बी फॉर्म अस्विकृत होत असल्यास, नामनिर्देशन पत्र अपक्ष उमेदवार म्हणून स्वीकृत करण्याबाबत उमेदवार श्री. पाटील यांनी दि. ३ एप्रिल २०२४ च्या पत्रान्वये विनंती अर्ज केला होता. तसेच त्यांनी दहा सूचक नावे देखील प्रस्तावक म्हणून सादर केली होती. त्यानुसार अपक्ष म्हणून त्यांचा अर्ज स्वीकारण्यात आला आहे, अशी माहिती दिली आहे.

# लोकसभा निवडणुकीमुळे शेगाव, खामगाव येथील परिवहनचे शिबीर रद्द

**जनसंचलन/बुलढाणा**



बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी दि. २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे खामगाव आणि शेगाव येथील परिवहन विभागाचे शिबिर रद्द करण्यात आले आहे. सदर शिबिर आता दि. २७ एप्रिल २०२४ रोजी खामगाव येथे घेण्यात येणार आहे, लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान असल्यामुळे दि. २५ एप्रिल २०२४ रोजी निवडणूक अनुषंगिक कामकाज मोटार वाहन निरीक्षक यांच्याकडे असल्यामुळे दि. २५ एप्रिल २०२४ रोजीचे शेगाव आणि दि. २६ एप्रिल २०२४ रोजीचे खामगाव येथील शिबीर रद्द करण्यात आले आहे. शेगाव व खामगाव येथे घेण्यात येणाऱ्या शिबीराऐवजी दि. २७ एप्रिल २०२४ रोजी खामगाव येथे शिबीर घेण्यात येणार आहे, असे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रसाद गाजरे यांनी कळविले आहे.

# निवडणूक निरीक्षकांशी सकाळी साधता येईल संपर्क



**जनसंचलन/बुलडाणा**

बुलढाणा लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम घोषित झाला आहे. या पार्श्वभुमीवर भारत निवडणूक आयोगाकडून बुलढाणा लोकसभा मतदारसंघाकरीता निवडणूक निरीक्षक यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणुकीबाबत तक्रार असल्यास निरीक्षकांशी सकाळी ९ ते १० या वेळेत दूरध्वनीवर संपर्क साधता येणार आहे. लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या निवडणूकीचा कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने दि. १६ मार्च २०२४ रोजी प्रसिद्ध केला आहे. त्यासाठी बुलढाणा लोकसभा मतदारसंघासाठी दुसऱ्या टप्प्यामध्ये दि. २६ एप्रिल २०२४ रोजी मतदान होणार आहे. निवडणूक निरिक्षक सर्वसाधारण म्हणून पी. जे. भागदेव असून त्यांचा संपर्क क्रमांक ७३८५९७६१४९ हा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी तुषार मेतकर ९८६०८२३६३७ हे आहे. निरीक्षक यांचे निवासस्थान सावित्री, शासकीय विश्राम गृह, बुलढाणा येथे आहे. निवडणूक निरिक्षक कायदा व सुव्यवस्था म्हणून सेनथील क्रिष्णा असून त्यांचा संपर्क क्रमांक ८४२१७९७६१४ हा आहे. त्यांचे संपर्क अधिकारी श्रीधर घुट्टे ९८५०३९४३४२ हे आहे. निरीक्षक यांचे निवासस्थान अजिंठा, शासकीय विश्राम गृह, बुलढाणा येथे आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निरीक्षक जिल्ह्यामध्ये दाखल झालेले आहेत. राजकीय पक्ष, उमेदवार, नागरिकांची तक्रार असल्यास संपर्क क्रमांकावर सकाळी ९ ते १० या वेळेत संपर्क साधता येईल, असे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी कळविले आहे.

# साठेगाव येथे मतदान जनजागृती साठी विद्यार्थ्यांनी काढली रॅली



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

तालुक्यातील साठेगाव येथे मतदान जागृती होणाऱ्या सर्वच निवडणुकीत मतदानाची टक्केवारीत वाढ होण्याच्या दृष्टीने निवडणूक आयोगाच्या वतीने मतदान जनजागृती करण्याकरिता स्वीप मोहीम राबविण्यात येत आहे .विशेष करून नविन मतदारांना निवडणूक प्रक्रिये बद्दल माहिती व्हावी या करीता विविध उपक्रम राबविले जात आहेत. जीवन विकास विद्यालय साठेगाव यांच्या वतीने गावातून रॅली काढण्यात आली या रॅली मधे विद्यार्थांच्या हातात जनजागृतीचे संदेश देणारे फलक होते या मधे आपले मत आपले भविष्य ,मतदान करा मतदान करा ,गो फॉर वोट , असे फलक झळकत होते .या रॅली दरम्यान निवडणूका ह्या लोकशाही प्रक्रियेचा कणा असल्यामुळे योग्य पद्धतीने केलेले मतदान आपल्या हक्काचे रक्षण करण्याच्या दृष्टीने टाकलेले पाहिले पाऊल असते . या रॅली मधे मुख्याध्यापक वणवे सर झोटे सर सानप सर चाटे सर देशमुख सर गायकवाड सर विजय सानप सर खरात मॅडम व कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

# राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष अफरोज अली यांचा समर्थकासह शिवसेनेत प्रवेश

**जनसंचलन/मेहकर**




खासदार प्रतापरावजी जाधव व आमदार डॉक्टर संजयजी रामुलकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून ४ एप्रिल २०२४ रोजी शिवसेना जनसंपर्क कार्यालयात मेहकर येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ( शरद पवार गट) अफरोज अली अल्पसंख्याक तालुकाध्यक्ष यांचा समर्थकासह शिवसेनेत (शिंदे गट) पक्ष प्रवेश केला आहे.

यावेळी खासदार प्रतापराव जाधव यांनी त्यांचे स्वागत करून सत्कार केला. अफरोज अली हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक तालुका अध्यक्ष होते. आपले विचार व्यक्त करताना त्यांनी सांगितले की, मागील अनेक वर्षापासून खासदार व आमदार यांच्या या मतदार संघात मुस्लिम समाजासाठी कोट्यावधीचा निधी देऊन विविध विकास कामे करण्याचा काम खासदार प्रतापरावजी जाधव व आमदार डॉक्टर संजयजी रायमुलकर हे करीत आहे . शिवसेना ही सामाजिक कार्य करणारी संघटना आहे. यांच्या नेतृत्वावर आम्हाला पूर्णपणे विश्वास असून येणाऱ्या लोकसभेत एका निष्ठेने काम करू असे मत अफरोज अली यांनी यावेळी सांगितले.

यावेळी अफरोज अली व त्यांचे सहकारी शेख कलीमउद्दीन , शेख मेहमूद, अहमद अली , शेख सोहेल ,शेख एजाज, जानमोहम्मद अली ,शेख आदिल, इसराइल ,शेख इसाक, सालार खान, फिरोज खान, समीर अली , तौकीर अली , हबिब तंबोली, शेख अल्ताफ, शेख कासम, सलीम खान ,सलमान खान , हबीब बेग, गफूर बेग, शेख नूर अतार यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी प्रवेश केला. कार्यक्रमाला उपस्थित शिवसेना तालुकाप्रमुख सुरेश तात्या वाळुकर, शहर प्रमुख जयचंद भाटिया, मेहकर नगर परिषदचे माजी नगरसेवक तौफिक भाई कुरेशी, माजी सभापती सुरेशराव आढाव, शिवसेना नेते विठ्ठल खोडवे, फिरोज भाई हे प्रामुख्याने उपस्थित होते.

# हक्काच्या जागा सोडू नका, वर्षावरील बैठकीत शिवसेना आमदारांचा नाराजीचा सूर...

**वृत्तसंस्था/मुंबई**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी पार पडलेल्या बैठकीत अनेक मंत्री आणि आमदारांनी उघडपणे नाराजी व्यक्त केल्याची माहिती पुढे आली आहे. ङ्गराज्यातील शिवसेनेच्या अनेक हक्काच्या जागा मित्र पक्षांसाठी सोडू नका,फ अशी आग्रही मागणी अनेक आमदारांकडून करण्यात आल्याचे समजते. त्याचबरोबर ज्या इच्छुकांना उमेदवारी मिळणार नाही, त्यांचे त्वरित पुनर्वसन करण्याची मागणीही या वेळी लावून धरण्यात आली.आगामी लोकसभा निवडणुकीसाठी महायुतीचे जागावाटप अंतिम टप्पात असताना, शनिवारी शिवसेना पक्षाची तातडीची बैठक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या ङ्गवर्षाफ या सरकारी निवासस्थ-ानी आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत शिवसेनेतील सर्व मंत्री, आमदार आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते. या बैठकीत अनेकांनी महायुतीच्या जागावाटपावरून नाराजी व्यक्त केल्याचे कळते.राज्यात काही दिवसांपूर्वी झालेल्या सत्तासंघर्षाचा दाखला अनेक आमदारांनी दिला. ङ्गआपण धाडस करून उठाव केला, म्हणून मित्रपक्षाला सत्तेचे फळ मिळाले,अशी प्रतिक्रिया अनेकांनी दिली. ङ्गपरभणी, उस्मानाबाद हे हक्काचे मतदारसंघ देऊन आपण युतीधर्म पाळला; पण आपले मित्रपक्ष युतीधर्म प्रामाणिकपणे पाळत आहेत का,फ असे प्रश्नचिन्ह अनेकांनी उपस्थित केल्याचे कळते. ङ्गरायगड, शिरूर हे मतदारसंघ आपल्या हक्काचे असतानाही मित्रपक्षाला देऊन आपण अपमान गिळून प्रचार सुरू केला आहे. परंतु, आता ठाणे, नाशिक, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, संभाजीनगर अजिबात सोडू नये, पाल-घरही मित्रपक्षांना देऊ नका,फ अशी आग्रही मागणी या वेळी अनेकांकडून करण्यात आली.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सर्वांना मार्गदर्शन करताना, आपापल्या मतदारसंघात जोमाने काम करण्याची सूचना केली. आपण केलेली विकासकामे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा, त्याचबरोबरच महायुतीचे उमेदवार



जिंकून आणण्यासाठी प्रयत्न करा, अशी सूचना त्यांनी केली. युतीमध्ये जेव्हा तीन पक्ष एकत्र येतात, तेव्हा काही वाटा द्यावा लागतो. तक्रार करण्यापेक्षा युतीधर्म पाळावा. आम्हाला मोदींना पंतप्रधान करायचे आहे. कोणी किती जागा लढवल्या, त्याने फरक पडत नाही. भाजप हा मोठा भाऊ असल्यामुळे त्याने एक-दोन जागा जास्त लढवल्या, तरी फरक पडत नाही,अशा शब्दांत त्यांनी उपस्थितांची समजून काढल्याचे समजते.

## आ.श्वेताताई महाले भाजप जिल्हाध्यक्ष गणेश मांटे यांची भाजप नेते विजयराज शिंदे यांच्याशी बंदद्वार चर्चा...

### भाजपा प्रदेशाध्यक्षांची शिंदे घेणार आज भेट...

**जनसंचलन/बुलढाणा**





भाजप नेते विजयराज शिंदे उमेदवारी अर्ज भरल्यानंतर महायुतीतील धुसफुस चव्हाट्यावर आली होती. महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रतापराव जाधव यांच्या अर्ज भरण्याच्या रॅलीत देखील शिंदे सहभागी झाले नव्हते. दरम्यान बंडाचे निशाण डॉ. फडकवणाऱ्या विजयराज शिंदेंना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर हे बावनकुळेंनी नागप-ूरात बोलावले आहे. त्याचा निरोप आज सायंकाळी चिखलीचे आमदार श्वेताताई महाले पाटील आणि जिल्हाध्यक्ष गणेश मांटे यांनी विजयराज शिंदेंना दिला. त्यासाठी भाजप-चे दोन्ही नेते सायंकाळी बुलडाण्यात दाखल झाले होते. शिस्तबद्ध समजल्या जाणाऱ्या भाजपात बुलढाणा लोकसभा निवडणूक प्रमुख विजयराज शिंदे यांनी अर्ज भरला आहे. शुक्रवार ५ एप्रिल रोजी झालेल्या छाननीत त्यांचा भाजपचा अर्ज बाद झाला, पण अपक्ष म्हणून भरलेला अर्जआणि बंडखोरी कायम आहे. यामुळे वरील दोन नेत्यांनी आज शनिवार ६ एप्रिल रोजी संध्याकाळी ६ वाजता बुलढाण्यातील विष्णुवाडी स्थित शिंदेंचे निवासस्थान गाठले. या तिघांमध्ये चाललेली बंदद्वार चर्चा रात्री ८ वाजता आटोपली. यादरम्यान बावनकुळे यांनी शिंदे व महाले यांच्यासमवेत चर्चा केली. मात्र तोडगा न निघाल्याने शिंदे, महाले, डॉ. मांटे, दीपक वारे यांना थेट ना-गपुरात पाचारण करण्यात आले आहे. रविवारी दुपारी बावनकुळे यांच्या निवासस्थानी ही निर्णयक बैठक होणार असल्याचे सांगण्यात आले.

## मतदार जनजागृती, या विषयावर निबंध स्पर्धा संपन्न



**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यातील रूहमणा ग्रामपंचायत कार्यालय रूम्हना, यांच्याकडून मतदार जनजागृती करण्यासाठी, मतदार जागृती काळाची गरज या विषयावर कै. तुकाराम कायदे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे, मतदार जागृती काळाची गरज या विषयावर निबंध स्पर्धा घेण्यात आली होती, यावेळी निबंध स्पर्धेमध्ये एकूण ३८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. त्यामध्ये प्रथम क्रमांक पुजा जायभाये, द्वितीय क्रमांक उत्कर्षा चाळसे, तृतीय क्रमांक काजल जायभाये, या विद्यार्थ्यांनी बक्षीस पटकाविले, या विद्यार्थ्यांना सरपंच सौशिकला भोसले, भगवान बाबा शिक्षण प्रस-ारक मंडळाचे सचिव प्राध्यापक शिवराज कायंदे, ग्रामपंचायत सचिव विनोद सातपुते, यांच्या हस्ते बक्षीस वितरण नुकतेच करण्यात आले, यावेळी प्राध्यापक उद्धव गवई यांनी शंभर टक्के मतदान होण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या आई-वडिलांना तसेच आपल्या घरातील प्रत्येक नागरिकास, मतदान करण्यासाठी, हट्ट धरावा, म्हणजे शंभर टक्के मतदान होईल, लोकशाही बळकट करण्यासाठी, प्रत्येकाने मतदान करावे असे आवाहन सुद्धा त्यांनी केले

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे
दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958